श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

# संगमेश्वर कॉलेज
# सोलापूर



# प्रतिभासंगम

वर्ष पाचवे । अंक १२ वा । जुलै ते सप्टेंबर २०२३

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...
संगमेश्वर कॉलेज,सोलापूर



प्रेरणास्थान

# प्रतिभासंगम

**संपादक** – धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती** –
प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई
उपप्राचार्य प्रसाद कुंटे
प्रा. एस. डी. गोठे

**मुखपृष्ठ** – सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी** – प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक** -
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** – 0217/2600481 /82
**ई–मेल** –
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in

## अंतरंग...

संगमेश्वरमध्ये हँड्स ऑन रोबोटिक्सची कार्यशाळा ०३ ,संगमेश्वर कॉलेजमध्ये अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत ०४ ,विद्यार्थ्यांनो उद्योग विश्वातील करिअरमध्ये कठोर परिश्रम हवे – सुवर्णा झाडे ०६, विद्यार्थ्यांनो आर्टिफिशियल इंटेलिजन्स ,डेटा सायन्स या क्षेत्रातील संधीचा फायदा घ्या. - डॉ. पंकज डोळस ०७ संगमेश्वर कॉलेजमध्ये शहरस्तरीय क्रीडा शिक्षकांची सभा ०८,विद्यार्थ्यांनी सादर केली सदाबहार 'पाऊसगाणी' ०९

. 'पुस्तके जीवन जगण्याची कला शिकवतात त्यामुळे ग्रंथालयातील वैविध्यपूर्ण पुस्तकांचं वाचन करणे हे आपल्या महाविद्यालयीन जीवनामध्ये आद्य कर्तव्य माना . साहित्य, कला, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन या क्षेत्रातील अगाध ज्ञान जाणून घेण्यासाठी वाचनाकडे वळले पाहिजे. समृद्ध ग्रंथालयातील पुस्तके जीवनाला दिशा देतात. त्यातून वाचनाचा समृद्ध संस्कार रुजतो वाढतो. व्यक्तिमत्त्व विकासात भर घालणाऱ्या आणि ज्ञानसंपन्न करणाऱ्या ग्रंथांकडे मार्गदर्शक म्हणून पहिले पाहिजे 11

संपन्न आरोग्यासाठी प्राचीन आयुर्वेदातील ज्ञान जाणून घ्या – डॉ. संभाजी पाटील १३ भारताचा ७६ वा स्वातंत्र्यदिन संगमेश्वर कॉलेजमध्ये मोठ्या उत्साहात १४ , संस्कृत भाषा सर्व भारतीय भाषांची जननी आहे. संस्कृत भाषेत भारतीय संस्कृती चा आधार आहे. ज्ञान विज्ञान गणित इत्यादी सर्व विषयांसाठी संस्कृत भाषेचे त्या संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग आयोजित संस्कृत दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणेण्या म्हणून बोलत होत्या.15 राष्ट्रीय क्रीडा दिन संगमेश्वर मध्ये उत्साहात ….कोणत्याही क्षेत्रातल्या करिअरला खेळाने बळकटी प्राप्त होते - डॉ. राजेंद्र देसाई 16
कै. मेघराज काडादी स्मृतिदिन 18

आधुनिक अवकाश नेत्र ' या विषयावर सारंग ओक यांचे व्याख्यान २३ .स्पर्धा परीक्षेतील यश सातत्यपूर्ण अभ्यासातूनच मिळते - वरिष्ठ पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे २५ , संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाकडून हेरिटेज नेचर वॉकचे आयोजन २६ ,संगमेश्वर मध्ये रक्षाबंधन निमित्त मार्केटिंग एक्सपो कॉन्टेस्टचे आयोजन २७ कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचा उपक्रम ३१

जागतिक पोषण सप्ताहाच्या अनुषंगाने फ्रुट अँड व्हेजीटेबल कार्विंग स्पर्धा संपन्न ३२ , कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी जयंती प्रीत्यर्थ राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत केतन लिगाडे प्रथम ३४ मुलांना आवडीच्या क्षेत्रात संधी उपल करून द्या – अभियंता अर्चिता ढेरे ३६ संगमेश्वर पब्लिक स्कूलची गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात ३९ हिंदी दिवसानिमित्त डिजिटल पत्रिकेचे उद्घाटन ४०, संगमेश्वर कॉलेजमध्ये (AICRA ) पहिल्या रोबोटीक सेंटरची सुरुवात ४१

# संगमेश्वरमध्ये हँड्स ऑन रोबोटिक्सची कार्यशाळा





**सोलापूर प्रतिनिधी–**"आत्मनिर्भर भारत होण्यासाठी मिळालेले नॉलेज वाढवा. जो अभ्यास कराल, संशोधन कराल त्याचे पेटंट मिळवायचा प्रयत्न करा आणि महाविद्यालयाचे नाव लौकिक वाढवा." असे प्रतिपादन संगमेश्वर कॉलेजचे प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई यांनी केले.संगमेश्वर कॉलेजमधील व्होकेशनल इलेक्ट्रॉनिक्स विभाग व फिजिक्स (ज्यु.) विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "हँड्स ऑन रोबोटिक्स" या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.

या प्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे , पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, भौतिक शास्त्र विभागप्रमुख डॉ.शुभांगी गावंडे,तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. बचुवार,डॉ.जोगदे उपस्थित होते.प्रास्ताविक प्रा. शुभदा कुलकर्णी यांनी केले. त्यानंतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले .सूत्रसंचालन प्रा. प्रियंका पाटील यांनी केले. तर आभार प्रा.चंद्रकांत हिरतोट यांनी मानले.या प्रसंगी प्रा.प्रशांत शिंपी,प्रा.बाळकृष्ण कापसे, प्रा.डॉ.गणेश मुडेगावकर, प्रा.नागेश कोल्हे , प्रा. शंकर शितल, प्रा.श्रुती तुळशेट्टी,प्रा.मानसी काळे यांच्यासह बारावी इलेक्ट्रॉनिकचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेला साहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक एस. एस. नडीमेटला यांनी भेट दिली त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशा प्रकारच्या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांच्या क्रिएटिव्ह स्किल्सचा नक्कीच विकास होतो. असे त्यांनी प्रतिपादन केले.

# संगमेश्वर कॉलेजमध्ये अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

## कला,वाणिज्य आणि विज्ञान क्षेत्रातील संधीचा लाभ घ्या - उपप्राचार्य प्रसाद कुंटे

**सोलापूर प्रतिनिधी**

''कला,वाणिज्य आणि विज्ञान क्षेत्रातील वैविध्यपूर्ण संधीचा अवश्य लाभ घ्या. त्यासाठी कठोर मेहनत, सातत्यपूर्ण परिश्रम पूर्वक नियोजनाची गरज आहे.'' असे प्रतिपादन संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्रचार्य प्रसाद कुंटे यांनी केलं. कला,वाणिज्य आणि विज्ञान या तीनही विभागाच्या इयत्ता अकरावीच्या स्वागत समारंभ आणि अभिभाषण प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी कला समन्वयक - शिवशरण दुलंगे वाणिज्य विभाग समन्वयक - बसय्या हणमगाव, विज्ञान विभाग समन्वयक - रामराव राठोड, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे आदी उपस्थित होते.

कला शाखेतून करिअर करत असताना कला, साहित्य, संगीत याबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रात आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करत स्पर्धा परीक्षेमध्ये सुद्धा आपले करिअर आपण करू शकता. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धा परीक्षांकडे वळताना, बँकिंग क्षेत्रातील संधीचाही लाभ घ्यावा. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी आयआयटी, जेईइ, नीट, सीईटी या स्पर्धा परीक्षांचा अभ्यास समोर ठेवून परीक्षार्थी आणि ज्ञानार्थी या दोन्ही भूमिका पार पाडत असताना कठोर परिश्रमाबरोबर सातत्यपूर्ण नियोजन गरजेचे आहे.'' असेही ते म्हणाले.







दहावीच्या निकालानंतर अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थी उत्सुक होते. ही उत्सुकता काल संपली आजपासून अकरावीचे वर्ग शहरातील कनिष्ठ महाविद्यालयात सुरू झाले. सात रस्ता सारख्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या संगमेश्वर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त गर्दी केली होती. आपापले वर्ग, आस्थापना विभाग पाहण्यासाठी विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. याच कार्यक्रमात दहावीतील गुणवंतांचा व राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने मुलींच्या पाससाठी सहकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचाही कॉलेजच्या वतीने सत्कार करण्यात आला.

प्रारंभी तीनही विभागातील विद्यार्थ्यांचे स्वागत झाले संगमेश्वर गीतानंतर संस्थेच्या चित्रफितीतून शैक्षणिक कार्याचा आढावा घेण्यात आला . सर्व विभाग प्रमुखांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकानंतर पर्यवेक्षक आणि उपप्राचार्यांनी संवाद साधला. याप्रसंगी महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनो उद्योग विश्वातील करिअरमध्ये कठोर परिश्रम हवे

## - सुवर्णा झाडे

## संगमेश्वरमध्ये उद्योगविश्व आणि करिअर या विषयावर व्याख्यान



**सोलापूर दिनांक 28 जुलै**

''कठोर मेहनत,सातत्य, जिद्द, चिकाटीच्या बळावर आपले करिअर आपण नक्कीच उभे करू शकतो . उद्योजकता ही सध्या काळाची गरज बनली आहे. रोजगार देणारे उद्योजक निर्माण होण्यासाठी महाविद्यालयीन जीवनातच दिशा ठरवली पाहिजे.उद्योग विश्वातील करिअरमध्ये कठोर परिश्रम हवे.त्यादृष्टीने तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आपण घेतले पाहिजे. उद्योग विश्वातील नवे प्रवाह,आर्थिक जोखीम आपण जाणून घ्या. '' असा मोलाचा सल्ला सुवर्णा झाडे - खेलबुडे यांनी दिला. त्या संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या वतीने माझं करिअर या उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या 'करियर इन आंत्रप्रेन्यूरशिप' या विषयावर बोलत होत्या. याप्रसंगी मंचावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे उपस्थित होते.

वाणिज्य विभाग प्रमुख बसय्या हणमगाव यांनी आपल्या प्रास्ताविकात आर्थिक जगतात जोखीम स्वीकारून जो नवे उद्योग उभारतो तोच या क्षेत्रामध्ये सक्षम होऊ शकतो असे सांगत प्रास्ताविक केले.

प्रा. संगीता म्हमाणे यांनी सूत्रसंचालन केले तर यांनी प्रा. बाबासाहेब सगर आभार मानले.या प्रसंगी प्रा.रूपाली पाटील,प्रा.निनाद सपकाळ,प्रा.संतोष पवार यांच्यासह कनिष्ठ विभागातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थी, प्राध्यापक मंडळी उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनो आर्टिफिशियल इंटेलिजन्स ,डेटा सायन्स या क्षेत्रातील संधीचा फायदा घ्या. - डॉ. पंकज डोळस

## संगमेश्वर कॉलेजमध्ये व्यवस्थापन व संगणकशास्त्राच्या विद्यार्थ्यांचे स्वागत





**सोलापूर( प्रतिनिधी)**
" व्यवस्थापन आणि संगणक शास्त्रात महाविद्यालयीन जीवनात अभ्यास करताना काळ, काम आणि वेगाचे भान ठेवले तर या क्षेत्रात आपण अव्वल राहाल. त्यासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स ) , क्लाऊड कम्प्युटिंग, डेटा सायन्स या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण बदलांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या क्षेत्रातील संधीचा फायदा घ्यावा. '' असे प्रतिपादन हिराचंद नेमचंद कॉलेज व्यवस्थापनशास्त्र आणि संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. पंकज डोळस यांनी केलं . ते संगमेश्वर कॉलेज ( स्वायत्त ) मधील संगणक शास्त्र विभाग आयोजित विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई, विभागप्रमुख आणि संचालिका प्रा. ज्योती काडादी, प्रा.तारा काडादी -आळंद , आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. डोळस पुढे म्हणाले की, " माहिती आणि तंत्रज्ञानातील नवे बदल आत्मसात करत विद्यार्थी उत्तम करिअर करतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे मागील त्याला तंत्रशिक्षण मिळणार आहे .मोबाईल, संगणक, इंटरनेट यांचा वापर संशोधनासाठी, नवीन उपक्रमासाठी झाला तर नक्कीच फायदा होतो. सोशल मीडिया जगतामुळे माहितीची देवाण-घेवाण जलद गतीने होते. ज्ञानभाषा इंग्रजीचे महत्त्व जाणून घ्या.व्यक्तिमत्त्व विकासात इंग्रजी महत्त्वाची आहे ."

प्रारंभी प्राध्यापिका राजश्री हुंडेकरी यांनी कार्यक्रमाचा हेतू सांगत प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा सत्कार कॉलेजच्या वतीने झाला. त्यानंतर प्रातिनिधिक स्वरूपात विद्यार्थ्यांचे स्वागत झाले. याप्रसंगी प्रा. रेखा पाटील, प्रा. बमनिंग बुक्का आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.संगीता जोगदे यांनी केलं तर प्रा.साई सुमन यांनी सर्वांचे आभार मानले.

# संगमेश्वर कॉलेजमध्ये शहरस्तरीय क्रीडा शिक्षकांची सभा






**सोलापूर प्रतिनिधी** जिल्हा क्रीडा कार्यालय व सोलापूर महानगरपालिका क्रीडा कार्यालय यांच्यावतीने शालेय शहर स्तरीय क्रीडा स्पर्धा बाबत क्रीडा शिक्षकांची सभा 170 क्रीडा शिक्षकांच्या उपस्थितीत संगमेश्वर कॉलेजमध्ये संपन्न झाली. या सभेला जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, सोलापूर मनपा क्रीडा अधिकारी एम. के .शहापुरे, संगमेश्वर कॉलेजचे उपप्राचार्य पी .एन. कुंटे ,त्याचप्रमाणे क्रीडा अधिकारी गणेश पवार, सत्येन जाधव, नदीम शेख, सुनील धारूरकर,तानाजी मोरे, सुप्रिया गाढवे, जयराज मुंडे, जिमखाना चेअरमन प्रा. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण संघटनेचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव, शहराध्यक्ष विठ्ठल कुंभार उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार म्हणाले की, सोलापूरमध्ये 400 मीटर अथलेटिक्स सिंथेटिक मैदान, बॅडमिंटन हॉल त्याचप्रमाणे खेळाडूंसाठी चार मजली वस्तीगृह वाढवण्यात येणार , स्पर्धेसाठी येणाऱ्या पंचांच्या मानधनांमध्ये तीनशे रुपये करू,क्रीडा शिक्षकांसाठी कार्यशाळेचे , 100 क्रीडा शिक्षकांसाठी जिल्हा व तालुका प्रशिक्षनाचे आयोजन,स्पर्धेच्या ठिकाणी खेळाडूंसाठी पिण्याचे पाणी स्वच्छतागृह सुसज्ज मैदान करणे, सरते शेवटी 14 वर्षाखालील मुले व मुली शहर स्तर कबड्डी विजयी संघास त्यांच्यातर्फे स्पोर्ट्स शूज बक्षीस देणार असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.प्रसाद कुंटे यांनी आलेल्या सर्व क्रीडा शिक्षकांना शालेय शहरस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आणि बरेचशे क्रीडा शिक्षक व जिल्हाक्रीडा अधिकारी हे आमच्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्यामुळे मला याचा सार्थ अभिमान आहे असे मत व्यक्त केले कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. आनंद चव्हाण यांनी केली , उप प्राचार्य पी एन कुंटे यांनी अध्यक्षीय भाषण केले, सूत्रसंचालन प्रा. संतोष खेंडे व आभार प्रा. विक्रांत विभूते यांनी मांडले.

# विद्यार्थ्यांनी सादर केली सदाबहार 'पाऊसगाणी'

## संगमेश्वर कॉलेजच्या मराठी विभागाचा उपक्रम



**सोलापूर प्रतिनिधी**

'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे.' या बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे ओळींप्रमाणे निसर्गाची किमया पाहताना,अनुभवताना 'सावल्या फुलांच्या, पावले ही फुलांची, वाट हळवी वेचताना, सावर रे ए मना, सावर रे सावर रे' अशा सदाबहार पाऊस गाण्यांच्या सादरीकरणांनी विद्यार्थ्यांनी पावसावरील कवितांचा पाऊस पाडला. निमित्त होते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागात मराठी विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या पाऊसगाणी सादरीकरणाचे. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे,पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, कला विभागप्रमुख शिवशरण दुलंगे वाणिज्य विभागप्रमुख बसय्या हणमगाव यांची उपस्थिती होती.

प्रारंभीक तांत्रिक व सादरीकरणाच्या सूचना प्रा.संतोष पवार यांनी दिल्या. प्रा.अशोक निबर्गी यांनी मराठी विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या या काव्यवाचन आणि सादरीकरण उपक्रमाची माहिती देत प्रास्ताविक केलं.उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी कविता सादर करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



त्यानंतर कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी मराठी सारस्वतांच्या गाजलेल्या कविता सादर केल्या, काही विद्यार्थ्यांनी सामूहिक अभिवाचन केलं. काहींनी उत्स्फूर्त चालींवर कविता म्हटल्या. रिमझिम पडणाऱ्या श्रावणसरी आणि पावसाळ्यातील निसर्ग विविधतेचे सार्थ वर्णन करणारे शब्दआणि गेयपूर्ण कविता ऐकताना विद्यार्थी प्राध्यापकगण चिंब पावसात भिजून निघाले.

स्पर्धेचा निकाल - स्वरदा मोहोळकर - प्रथम, अवनी अहुजा ( हिंदी) - द्वितीय विभागून, समीक्षा डोके- द्वितीय विभागून, विराज चांदगोळी - तृतीय ,आरती ओहाळ -चौथा क्रमांक, समर्थ खरात - पाचवा क्रमांक

प्रा.कोमल कोंडा, प्रा.रश्मी कन्नूरकर यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. या प्रसंगी बोलताना प्राचार्य म्हणाले, '' संगमेश्वरच्या व्यासपीठाचा उपयोग करून जीवनात उत्तम असे करियर करा.'' प्रेरणादायी ग्रंथ, पुष्प देऊन विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.प्रा. विश्वनाथ कक्कळमेली यांनी उत्स्फूर्त कविता सादर केल्या.कार्यक्रम यशस्वीतेसाठी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक,विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. प्रा.दत्तात्रय गुड्डेवाडी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा.एस. बी. निंबर्गी यांनी आभार मानले.

संगमेश्वर कॉलेज सोलापूर

या कार्यक्रमाची संपूर्ण व्हिडिओ लिंक
https://youtu.be/ZW-Ih-5X02c
कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा

YouTube

# कॉलेजच्या ग्रंथालय दर्शन उपक्रमातून दुर्मिळ ग्रंथांचा परिचय

## पुस्तके जीवनाची पुस्तके जीवन जगण्याची कला शिकवतात - संतोष कुलकर्णी

**सोलापूर ( दिनांक 9 )** ''पुस्तके जीवन जगण्याची कला शिकवतात त्यामुळे ग्रंथालयातील वैविध्यपूर्ण पुस्तकांचं वाचन करणे हे आपल्या महाविद्यालयीन जीवनामध्ये आद्य कर्तव्य माना . साहित्य, कला, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन या क्षेत्रातील अगाध ज्ञान जाणून घेण्यासाठी वाचनाकडे वळले पाहिजे. समृद्ध ग्रंथालयातील पुस्तके जीवनाला दिशा देतात. त्यातून वाचनाचा समृद्ध संस्कार रुजतो वाढतो. व्यक्तिमत्त्व विकासात भर घालणाऱ्या आणि ज्ञानसंपन्न करणाऱ्या ग्रंथांकडे मार्गदर्शक म्हणून पहिले पाहिजे. स्पर्धा परीक्षेच्या वातावरणात ग्रंथ आपल्याला तत्कालीन स्थलकालाची माहिती देतात. '' असा दिलखुलास संवाद मार्गदर्शक या नात्याने सहाय्यक ग्रंथपाल संतोष कुलकर्णी साधत होते. निमित्त होते संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) कनिष्ठ विभाग हिंदी विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या ग्रंथ दर्शन उपक्रमाचे. उपप्राचार्य प्रसाद कुंटे , ग्रंथपाल विजयकुमार मुलीमनी यांच्यासह विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.







प्रारंभी प्राध्यापक शिवराज पाटील यांनी प्रास्ताविक केले. या प्रास्ताविकात या उपक्रमा वैविध्यपूर्ण उपक्रमातील बाबी स्पष्ट केल्या. ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथ कसे जतन केले जातात. त्याचं मूल्य याबद्दल त्यांनी सांगितलं. उपप्राचार्यांनी आपल्या मनोगतात या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत, काय वाचावं ?कसं वाचावं ? किती वाचावं ? याविषयीचे मार्गदर्शन केले आणि हा उपक्रम सर्वांसाठी राबवावा असे आवाहन केले.

वक्त्यांचा परिचय वैभवी स्वामी हिने करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षता बोरगी हिने केले. तर आभार अमृता गुरव हिने मानले. विज्ञान विभाग प्रमुख रामराव राठोड, ग्रंथालय कर्मचारी संजय कुंभार, आदी उपस्थित होते.

# विज्ञान आणि आयुर्वेद या विषयावर संगमेश्वरमध्ये व्याख्यान

## संपन्न आरोग्यासाठी प्राचीन आयुर्वेदातील ज्ञान जाणून घ्या - डॉ. संभाजी पाटील



**सोलापूर प्रतिनिधी**

'' बदलत्या जीवनशैलीमुळे मानवाला आरोग्य कडे लक्ष द्यायला वेळ नाही अशी गतिमान परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे जीवन व्याधीग्रस्त बनत चालले आहे संपन्न आरोग्यासाठी प्राचीन आयुर्वेदातील ज्ञान जाणून घ्या आणि त्याचा वापर करा वैज्ञानिक दृष्टीने आयुर्वेदातील बारकावे जाणून घेतले तर जीवन संपन्न होईल'', असे मत डॉ. संभाजी पाटील यांनी व्यक्त केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रसाद कुंटे, विज्ञान विभाग प्रमुख रामराव राठोड उपस्थित होते.

प्रशांत पाटील यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर कॉलेजच्या वतीने वक्त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यानी विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला ते पुढे म्हणाले की, '' योग आणि आयुर्वेद यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. काळ काम आणि वेगाबरोबर आपण काम करत राहिलो तर निश्चितच आपण इच्छित ध्येय गाठू शकतो. त्यासाठी कठोर मेहनत सातत्यपूर्ण अभ्यासाची गरज आहे. दैनंदिन सूर्यनमस्काराने तान तणावाचे व्यवस्थापन आपोआपच होते त्याचा अंगीकार महत्त्वाचा आहे.

याप्रसंगी विज्ञान शाखेतील विद्यार्थी, शिक्षक विज्ञान मंडळाचे समन्वयक सुभाष पाटील, लीना खमितकर, प्रियांका पाटील , तुळशेट्टी, शंकर शितल,उपस्थित होते. रूपाली अंबुलगे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रशांत शिंपी यांनी सर्वांचे आभार मानले.

# भारताचा ७६ वा स्वातंत्र्यदिन संगमेश्वर कॉलेजमध्ये मोठ्या उत्साहात

## भारतीय स्वातंत्र्यदिन चिरायू होवो !

**सोलापूर प्रतिनिधी**

भारताचा ७६ वा स्वातंत्र्यदिन संगमेश्वरमध्ये मोठ्या उत्साहात साजरा झाला. सर्वप्रथम ९ महाराष्ट्र एनसीसी बटालियन च्या वतीने मानवंदना देण्यात आली. त्यानंतर प्राचार्य राजेंद्र देसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. उपस्थितांना प्राचार्यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

ध्वजारोहण कार्यक्रमानंतर नव्याने सेवेत आलेल्या ९ महाराष्ट्र एनसीसी बटालियनच्या जवानांचा सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात निवृत्त जवान आप्पासाहेब काळे आणि अण्णा निंबाळकर यांचा सत्कार कॉलेजच्या वतीने करण्यात आला. महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील नवनियुक्त अध्यापकांचे स्वागत करण्यात झाले. त्यानंतर स्वरदा मोहोळकर या विद्यार्थिनींने देशभक्तीपर गीते सादर केली.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सुहास पुजारी ,रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीनिवास गोठे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्रचार्य प्रसाद कुंटे, चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन गायकवाड, सीओईपी पुण्याचे प्रा. प्रवीण रेवणकर डॉ. अर्चना ठोसर-रेवणकर,प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.मेजर चंद्रकांत हिरतोट यांनी सूत्रसंचालन केले.







# संगमेश्वरमध्ये विश्व संस्कृत दिवस उत्साहात

## संस्कृत भाषाज्ञान व्यक्तीला ज्ञानसंपन्न बनवते — प्रा. श्रुती देवळे

**सोलापूर प्रतिनिधी** ( दिनांक २९ ऑगस्ट २०२३ ) '' संस्कृत भाषा सर्व भारतीय भाषांची जननी आहे. संस्कृत भाषेत भारतीय संस्कृती चा आधार आहे. ज्ञान विज्ञान गणित इत्यादी सर्व विषयांसाठी संस्कृत भाषेचे त्या संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग आयोजित संस्कृत दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणेण्या म्हणून बोलत होत्या. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे होते.

या निमित्ताने संस्कृत मधून नृत्य गीत गायन आणि नाटकेचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. त्यानंतर संस्कृत दिनाच्या निमित्ताने माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या शुभेच्छा संदेश विद्यार्थ्यांना ऐकवण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय संस्कृत शिक्षक प्रदीप आर्य यांनी केला. उपप्राचार्य श्री प्रसाद कुंटे यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांमध्ये कथक नृत्य, संस्कृत का शिकावी ? यासंबंधीची पीपीटी अभिज्ञानशाकुंतलम् नाटकाचा सारांश आणि संस्कृत भाषेचा वापर या विषयावरती एक संस्कृत नाटिका विद्यार्थ्यांकडून सादर केली गेली.

या कार्यक्रमासाठी संस्कृत विभाग आणि मराठी विभागातील विद्यार्थ्यांची तसेच विशाल जत्ती, संतोष पवार ,सुभाष पाटील, विश्वनाथ कक्‍ळमेली प्रकाश कतनाळे, कोमल कोंडा यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विद्यार्थिनी श्रेयसी कुंटे तर आभार संजना सोनकडे या विद्यार्थिनीने मानले.







**संस्कृत दिनाच्या आणि रक्षाबंधनाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा – संगमेश्वर परिवार**

**कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा**

https://youtu.be/JEMlenhg44I?feature=shared

संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# राष्ट्रीय क्रीडा दिन संगमेश्वर मध्ये उत्साहात

## कोणत्याही क्षेत्रातल्या करिअरला खेळाने बळकटी प्राप्त होते - डॉ. राजेंद्र देसाई

**सोलापूर ( दि. २९ )** ''आपल्या व्यस्त दिवसातून थोडा वेळ काढणे आणि तंदुरुस्त आणि सक्रिय राहण्यासाठी एखाद्या खेळात गुंतून राहणे महत्वाचे आहे. दीर्घ आणि आनंदी आयुष्य जगण्यासाठी, व्यक्ती मानसिक, शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या तंदुरुस्त असणे महत्वाचे आहे. ते केवळ खेळांमुळे शक्य आहे. कोणत्याही क्षेत्रातल्या करिअरला खेळाने बळकटी प्राप्त होते.असे प्रतिपादन डॉ. राजेंद्र देसाई यांनी केले. ते ष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने संगमेश्वर कॉलेजच्या मैदानावर आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीनिवास गोठे, संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या प्राचार्य प्रियांका समुद्रे शारीरिक शिक्षण संचालक आनंद चव्हाण आदी उपस्थित होते. विविध क्रीडा स्पर्धा मैदानावर संपन्न झाल्या.











## अंतिम निकाल

**14 वर्षाखालील संगमेश्वर पब्लिक स्कूल**

**सूर्यनमस्कार**

प्रथम- मयूर यादव
द्वितीय- शिवानी हावशेट्टी
तृतीय -सहर्षा सिंह

**गोळाफेक प्रकार मुली**

प्रथम- मुक्ताई धाराशिवकर
द्वितीय- स्नेहा राठोड
तृतीय -रीधीशा बोबडे

**गोळा फेक मुले**

प्रथम -एजान नदाफ
द्वितीय - अरसलान फुलमांमडी
तृतीय- निल भोसले

**100 मीटर धावणे मुली**

प्रथम -पौर्णिमा गुजले
द्वितीय -अक्षता वैद्य
तृतीय -रिद्धीशा बोबडे

**मुले**

प्रथम- श्रीनिवास कोरे
दुतीय -श्लोक स्वामी
तृतीय- आर्यन येमूल

**17 वर्षाखालील स्पर्धा**

**सूर्यनमस्कार**

प्रथम- भारती शिवगुंडे
द्वितीय -सृष्टी कलशेट्टी
तृतीय- आरोशी लवंगे

**गोळा फेक मुली**

प्रथम -श्रुती निंबाळकर
द्वितीय- बीबी मरियम शेख
तृतीय -नेत्रा कलशेट्टी

**मुले**

प्रथम- अदित्य मेडीदार
द्वितीय -आशिष शिंदे
तृतीय -अभिषेक दडगे

**100 मीटर धावणे मुली**

प्रथम- बीबी मरियम शेख
द्वितीय -समृद्धी टोनपे
तृतीय -श्रावणी यरगोळ

**मुले**

प्रथम -सागर शेटे
द्वितीय- तन्मय गडदे
तृतीय -प्रतिक गुट्टे

***19 वर्षाखालील मुले जुनिअर कॉलेज***

***सूर्यनमस्कार***

प्रथम- शिवम कांबळे
द्वितीय -मंथन जुटलीगे
तृतीय -प्रतीक मंडीवाळ

**मुली**

प्रथम- मेघना बलदवा
द्वितीय -अनुश्री वेदपाठक
तृतीय- प्रियंका पवार

**गोळा फेक मुली**

प्रथम- प्रतिभा टोणपे
द्वितीय -पल्लवी मंडले
तृतीय- काजल पवार

**गोळा फेक मुले**

प्रथम -साकीब शेख

द्वितीय -ओंकार बिराजदार
तृतीय -विजय जाधव

100 मीटर धावणे
मुली
प्रथम आरती खरात
द्वितीय आर्थिक राठोड
तृतीय पल्लवी

**100 मीटर धावणे मुले**

प्रथम -चेतन गावडे
द्वितीय- कैलास वैद्य
तृतीय -विजय जाधव

**सीनियर कॉलेज खुला गट**

**सूर्यनमस्कार**

मुली -प्रथम राणी कुशवाह
द्वितीय- नंदिनी राठोड
तृतीय- सई दरेकर

**मुले**

प्रथम -मनोज होसमाने
द्वितीय -नरेंद्र डोनुरे
तृतीय- रोहित धुते

**गोळा फेक मुली**

प्रथम- प्रतीक्षा दसुर
द्वितीय -नेहा साठे
तृतीय- रितू बनने

**मुले**

प्रथम -तुषार सोनवणे
द्वितीय -चेतन चव्हाण
तृतीय -अभय पाटील

**100 मीटर धावणे मुली**

प्रथम -प्रतिभा बगले
द्वितीय -सौंदर्य माने
तृतीय -अर्पिता शिंदे

**मुले**

प्रथम -शकील नदाफ
द्वितीय- रेवणसिद्ध किरणाळी
तृतीय -ॠतुराज बडदाळे

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष खेडे यांनी केले तर आभार शरण वांगी यांनी मानले. स्पर्धा यशस्वीतेसाठी प्रा. विक्रांत विभुते, प्रा.संतोष पवार प्रा. शिवराज पाटील, अण्णा निंबाळकर , दत्ता भोईटे आदींनी परिश्रम घेतले.

# कै. मेघराज काडादी स्मृतिदिन

## काकांनी उदार दृष्टिकोनातून संस्थात्मक कार्य केले - प्रा. डॉ. सुहास पुजारी



**सोलापूर ( दिनांक 2 सप्टेंबर )** आदरणीय मेघराज काकांनी संस्थात्मक पातळीवर काम करताना साधी राहणी व उच्च विचारसरणीचा अवलंब करून निर्मोही वृत्तीने काम केले. ते उच्च विभाग विद्याविभूषित होते .आप्पांच्या गांधीवादी विचारसारणीचा त्यांच्यावर प्रभाव होता. आपुलकीने ते सगळ्यांना आपलेसे करून घेत. निस्पृह वृत्तीने आणि उदार दृष्टीकोनातून त्यांनी संस्थात्मक कार्य उभे केले.'' असे प्रतिपादन उपप्राचार्य प्रा. डॉ. सुहास पुजारी यांनी केले. ते संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे माजी कार्याध्यक्ष कै. मेघराज काडादींच्या स्मृतीदिन प्रसंगी अभिवादन कार्यक्रमात संगमेश्वर कॉलेजमध्ये बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई उपस्थित होते.

प्रारंभी पुष्पहार अर्पण करून शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले. त्यानंतर मान्यवरांनी आपल्या आठवणींना उजाळा दिला. प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई यांनी शैक्षणिक कार्य करताना कॉलेजच्या कामकाजा संदर्भात त्यांनी केलेले मार्गदर्शन या संदर्भात आठवणींना उजाळा दिला . सूत्रसंचालन प्रा.डॉ.संतोष मेटकरी यांनी केले तर आभार ग्रंथपाल विजयकुमार मुलीमनी यांनी मानले.



# संगमेश्वर कॉलेजला सलग पाचव्यांदा डॉ. पुरणचंद्र पुंजाल फिरता चषक

## क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल विद्यापीठाने केले सन्मानित




--पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. त्यामध्ये यावर्षी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सर्वोत्कृट कामगिरी केल्याबद्दल संगमेश्वर कॉलेजला सलग पाचव्यांदा डॉ. पुरणचंद्र पुंजाल फिरता चषक प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठातील पूर्व व्यवस्थान सदस्य श्री. अमित कुलकर्णी, प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे, कुलसचिव योगिनी घारे, संचालक डॉ. केदारनाथ काळवणे हे मान्यवर उपस्थित होते. संगमेश्वर कॉलेजच्या वतीने प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास गोटे, क्रीडा विभागाचे प्रमुख प्रा. आनंद चव्हाण, डॉ. शिवाजी मस्के, श्री. वैजू स्वामी आणि यशस्वी खेळाडू मोठया संख्येने उपस्थित होते. संगमेश्वर कॉलेजला उज्जवलशाली क्रीडा परंपरा आहे. गेली अनेक वर्षे आंतरराष्ट्रीय पातळीवर यश संपादन करणारे खेळाडू कॉलेजमधून घडलेले आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन आणि संधीची उपलब्धता निर्माण करून दिली जाते. कॉलेजच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव धर्मराज काडादी, व्यवस्थापन सदस्या प्रा. ज्योती काडादी, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

**मनःपूर्वक अभिनंदन !!!**



# शिक्षकदिन उत्साहात

## संगमेश्वरमध्ये विद्यार्थ्यांकडून 'कृतज्ञता सोहळा'






**सोलापूर ( दिनांक 5 सप्टेंबर )**
भारताचे माजी राष्ट्रपती, थोर तत्वज्ञ, भारतरत्न, शिक्षक डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस संपूर्ण भारत वर्षात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. शिक्षक दिनाचे औचित्य साधून संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन विद्यार्थ्यांनी केले होते. या प्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, ज्येष्ठ शिक्षक तानाजी घाडगे उपस्थित होते .

प्रारंभी स्वरदा मोहोळकर, वैष्णवी घाडगे यांनी स्वागत गीत सादर केले. विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या कृतज्ञता सोहळ्याचे प्रास्ताविक जान्हवी परदेशी हिने केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचा सत्कार झाला. सत्कारानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्यकर्तुत्वाचा आढावा घेत आपली मनोगते व्यक्त केली. यामध्ये श्रेयसी कुंटे,आरती ओव्हाळ, राजश्री गाडेकर, प्रतिमा टोणपे, सृष्टी खरात यांनी मराठीतून आपलं मनोगत व्यक्त केलं. तर ऋग्वेद देशमुख (संस्कृत) अवनी अहुजा (हिंदी) सुमित्रा म्हेत्रे (कन्नड) उत्तमा ढगे ( इंग्रजी ) यांनी त्यांच्या आवडीच्या भाषेतून उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षकांच्या मनोगतात तानाजी घाडगे, दत्तात्रय गुड्डेवाडी, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात उपप्राचार्य यांनी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या सोहळ्याचे कौतुक केले आणि सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.सूत्रसंचालन समीक्षा डोके आणि राधिका देशपांडे यांनी केले तर श्रुती खरात हिने सर्वांचे आभार मानले.

**या कार्यक्रमाचा संपूर्ण व्हिडिओ अवश्य पहा आमच्या कॉलेजच्या युट्युब चॅनेल वरून**

YouTube https://youtu.be/Hs1zyQ9Qh90?feature=shared

संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# बँकिंग मधील आर्थिक साक्षरतेची गरज - हनुमंत भालेराव

## संगमेश्वर कॉलेज वाणिज्य शाखेचा उपक्रम




**सोलापूर प्रतिनिधी**

''बँकेच्या नावाखाली येणारे फ्रॉड कॉल,,मेसेजेस यापासून आपण सावध राहिले पाहिजे. बँकेकडून अधिकृत अँपची सुविधा उपल करून दिलेली असते या सेवेच्या संदर्भात आपण जागरूक राहिलो तर आपली आर्थिक फसवणूक होणार नाही. वाढत्या ऑनलाइन घोटाळ्याच्या या जमान्यात त् बँकिंगमधील आर्थिक साक्षरता ही काळाची गरज बनत चालली आहे '' असे प्रतिपादन जिल्हा अग्रणी बँक व वित्तीय समावेशन विभाग सोलापूर आंचलित कार्यालयातर्फे आर्थिक साक्षरता शिबिर अंतर्गत आलेले तज्ज्ञ मार्गदर्शक हनुमंत भालेराव यांनी केले. संगमेश्वर महाविद्यालय कनिष्ठ विभाग वाणिज्य शाखा यांच्या वतीने 'माझं करिअर' या उपक्रमामधील 'बँकिंग मधील आर्थिक साक्षरता' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे ,पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.बसय्या हणमगाव आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी प्रा.बसय्या हणमगाव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.प्रा. निनाद सपकाळ, प्रा. पी.पी. अवधानी,प्रा. आर. एस. मळेवाडी,प्रा.रवींद्र बिराजदार,प्रा.गौरव जुगदार, प्रा.रुपाली पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. संगीता म्हमाणे यांनी केले तर आभार प्रा.बाबासाहेब सगर यांनी मानले.

# इंग्रजीप्रमाणे सॉफ्ट स्किल्स अंगीकारणेही महत्त्वाचे आहे - डॉ.सतीश लकडे

## संगमेश्वर महाविद्यालयात इंग्रजी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन





**सोलापूर प्रतिनिधी –** 'सॉफ्ट स्किल्स सेल्फ मोटिवेशन' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.ते म्हणाले जीवनात प्रगती साधायची असेल तर इंग्रजी भाषेतील प्रभुत्व ज्याप्रमाणे महत्त्वाचे आहे त्याचप्रमाणे सॉफ्ट स्किल्स अंगीकारणेही महत्त्वाचे आहे.''असे प्रतिपादन डॉ.सतीश लकडे ( एच.आर.,एन्जिग्मा सॉफ्टवेअर, पुणे ) यांनी केले.ते संगमेश्वर महाविद्यालयातील इंग्रजी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे या नात्याने त्यांच्या हस्ते पार पडले.त्यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. सुहास पुजारी हे होते.

सुरुवातीला स्वागत व प्रास्ताविक प्रा.डॉ.उषा जमादार यांनी केले.प्रा.डॉ. रेश्मा जावळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. नंदा साठे यांनी मनोगत व्यक्त केले. तर प्रा.डॉ. सुहास पुजारी यांनी अध्यक्षीय भाषण केले. प्रा.डॉ. सतीश लकडे यांनी सॉफ्ट स्किल्सची व्याख्या करून त्यांनी सॉफ्ट स्किल्स आणि हार्ड स्किल्स यामधील फरक स्पष्ट केला तसेच पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या आधारे मनोरंजक व सोप्या पद्धतीने सेल्फ मोटिवेशन कसे करायचे हे विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगितले.

इंग्रजी विषयात सेट नेट उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा ही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार याच कार्यक्रमात करण्यात आला.याप्रसंगी प्रा.डॉ. मकानदार, प्रा.डॉ.रेश्मा शेख आणि प्रा. संतोष पवार यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. प्रा.रेवण हालोळी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. चिकटे यांनी सर्वांचे आभार मानले.






# 'आधुनिक अवकाश नेत्र' या विषयावर सारंग ओक यांचे व्याख्यान

# कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा उपक्रम




**सोलापूर - दिनांक ७ सप्टेंबर** आकाशातील चंद्र तारे सूर्यग्रहण किती आहेत याचा अभ्यास करू शकतो का ? एकच तारा दिसतो बाकीचे तारे का दिसत नाहीत ? ताऱ्यांची संख्या मोजू शकता का ? पृथ्वीवर सजीवसृष्टीची उत्पत्ती कशी झाली ? अशा अवकाशाविषयीच्या अनेक प्रश्नांची उत्तरे सारंग ओक यांनी दिली. ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या वतीने आयोजित ' आधुनिक अवकाश नेत्र ' या कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य राजेंद्र देसाई, उपप्राचार्य प्रसाद कुंटे उपस्थित होते. प्रारंभी उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्राचार्यांनी या अभिनव उपक्रमाविषयी कौतुक करत संवाद साधला.

हब्बल स्पेस टेलिस्कोप ३४ वर्षांपूर्वी अवकाशात पाठवला गेला तो आजही कार्यरत आहे. काही महिन्यापूर्वी महिन्यापूर्वी जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप सोडला गेला. चंद्रयान ३ मोहीम यशस्वीरित्या संपन्न झाली. चंद्रावरती पाणी आणि तेथील सजीवसृष्टीचा अभ्यास सुरुय.मानवी वास्तव्य होऊ शकेल का ? याचा अभ्यास सध्या लँडरच्या मदतीने सुरु आहे.असेही त्यांनी सांगितले.






प्रारंभी माता सरस्वती आणि कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून, दीपप्रज्वलित करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय लीना खमितकर यांनी करून दिला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार प्राचार्यांच्या हस्ते झाला.प्रमुख पाहुण्यांनी चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला. याप्रसंगी विज्ञान विभाग समन्वयक प्रा.रामभाऊ राठोड, प्रा.बाळकृष्ण कापसे, प्रा.विशाल जत्ती, प्रा.सुभाष पाटील,प्रा.प्रशांत पाटील,प्रा.संतोष पवार प्रा.अभिजीत निवर्गीकर, प्रा. एस. आर. पाटील,प्रा.नागेश कोल्हे, स्मिता शिंदे, प्रा.शंकर शितल,प्रा.संगमेश स्वामी,प्रा.रूपाली आंबुलगे उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रा.प्रियंका पाटील यांनी केले तर आभार प्रा. प्राजक्ता चव्हाण यांनी मानले.




# स्पर्धा परीक्षेतील यश सातत्यपूर्ण अभ्यासातूनच मिळते
### - वरिष्ठ पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे

# संगमेश्वर कॉलेजमध्ये भूगोल अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन










**सोलापूर दिनांक 8 प्रतिनिधी** '' स्पर्धा परीक्षेत करिअर करताना मिळालेल्या प्राप्त परिस्थितीतून कठोर परिश्रम करत आपण अभ्यास केला पाहिजे. परिस्थिती बिकट असली तरी आपल्या ध्येयापासून विचलित न होता सतत प्रयत्नवादी राहिलो, तरच आपण या स्पर्धेच्या जगात टिकू शकतो. मोबाईल, इंटरनेटच्या जगात वावरताना आपला वेळ इतर गोष्टीत जात नाही ना ? यासाठी काळ- काम आणि वेळेचे नियोजन महत्त्वाचे आहे. हे सरावातून साध्य होते. यासोबत आपली संवेदनशीलता आपण आपल्या वाचनातून, कृतीतून, बाह्य सामाजिक निरीक्षणातून टिकवली पाहिजे. उत्तम अधिकारी होताना स्पर्धा परीक्षेतील यश सातत्यपूर्ण नियोजनबद्ध अभ्यासातूनच मिळते.'' असा मौलीक सल्ला तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनी दिला. ते भूगोल अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई, भूगोल विभागप्रमुख डॉ, राजकुमार मोहोरकर उपस्थित होते.

प्रारंभी दीप प्रज्वलन झाले. त्यानंतर भूगोल विभाग प्रमुखांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकानंतर प्रमुख पाहुण्यांचा प्राचार्यांनी सत्कार केला. तत्पूर्वी प्रमुख पाहुण्यांची ओळख राहुल गोसावी यांनी करून दिली. जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिकताना ग्रामीण परिसर अनुभवताना आणि पोलिसातील अनेक बाका प्रसंग सांगत नामदेव शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

प्रा.डॉ.शिवाजी मस्के,प्रा.डॉ.मंजू संगेपाग, प्रा.डॉ.संतोष मेटकरी,प्रा.संतोष पवार,प्रा. प्रकाश कादे, प्रा. शिरीष जाधव, प्रा.वैभव इंगळे, प्रा.धनश्री कराळे , प्रा. राहुल साळुंखे , धनंजय बच्छाव आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन वैष्णवी गोळेकर आणि रिद्धी बुवा यांनी केले.तर आभार बिराप्पा सोनकवडे यांनी मानले.

# ऐतिहासिक वास्तूंमधून अनुभवला सोलापूरचा ऐतिहासिक वारसा

## संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाकडून हेरिटेज नेचर वॉकचे आयोजन



सोलापूरातील ऐतिहासिक वास्तू धनराज गिरजी हॉस्पिटल

कोणत्याही शहराला जाज्वल्य इतिहास असतो. सोलापूरला देखील भारतीय स्वातंत्र्यलढ्यात एक मोठा इतिहास लाभलेला आहे चार दिवस स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्वातंत्र्य उपभोगलेले हे शहर १९ व्या शतकात कसे होते. हे या वास्तूतून लक्षात येते. म्हणून जुन्या वास्तू पाहणे आणि त्यांचा इतिहास जाणून घेणे हे आपण विद्यार्थी संशोधक म्हणून अवश्य केले पाहिजे. ऐतिहासिक वास्तू मधून सोलापूरचा इतिहास आपल्याला माहीत होतो. त्यामुळे आपण सोलापूरातील ऐतिहासिक वास्तूंचे दर्शन घेऊन त्यांचा इतिहास समजावून घेतला पाहिजे. या हेतूने संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या वतीने भूगोल आणि इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी हेरिटेज वॉक चे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर महानगरपालिका,धनराज गिरजी हॉस्पिटल व डॉ.द्वारकानाथ कोटणीस स्मारक येथे प्रत्यक्ष भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या हेरिटेज - नेचर वाक साठी एकूण 77 विद्यार्थी सहभाग झाले होते. रात्र महाविद्यालयाच्या प्रा.सोनाली गिरी यांनी ऐतिहासिक वास्तूबद्दल ऐतिहासिक सविस्तर माहिती सांगितले माहिती सांगितली. याप्रसंगी कला शाखा समन्वयक प्रा. शिवशरण दुलंगे, प्रा.शंकर कोमलवार, सौ. रश्मी कन्नूरकर, डॉ.विठ्ठल आरबळे यांच्यासह कला शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.





सोलापूर शहरातील डॉ.द्वारकानाथ कोटणीस स्मारक आणि सोलापूर महानगरपालिकेची इंद्रभुवन इमारत

# संगमेश्वर मध्ये रक्षाबंधन निमित्त मार्केटिंग एक्सपो कॉन्टेस्टचे आयोजन



**संगमेश्वर मध्ये रक्षाबंधनानिमित्त मार्केटिंग एक्सपो कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी डावीकडून प्रा. शिवाजी मस्के, प्रा. हुंडेकरी ,प्रा.आरती दिवटे ,कॉमर्स असोसिएशनचे समन्वयक प्रा. खिलारे , प्राचार्य आर. व्ही. देसाई , उपप्राचार्य वंदना पुरोहित उपस्थित होते.**

**सोलापूर ( दिनांक 28 )** संगमेश्वर महाविद्यालय स्वायत्त सोलापूर मधील कॉमर्स विभागाच्या वतीने रक्षाबंधन पवित्र धाग्याचा सण या अनुषंगाने मार्केटिंग एक्सपो कॉन्टेस्ट आयोजित करण्यात आले या कार्यक्रमाचे उदघाटन माननीय प्राचार्य डॉ. आर व्ही देसाई यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी माननीय प्राचार्यांनी पर्यावरण संवर्धनाचे प्रतीक म्हणून गुलमोहरच्या झाडाला राखी बांधली. विद्यार्थ्यांनी व्यवसाय कसा करावा, आपल्या वस्तूचे मार्केटिंग कसे करावे, इ.चा प्रत्यक्ष अनुभव यावा या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. डॉ. शिवाजी मस्के, प्रा. डॉ. आरती दिवटे, प्रा. राजश्री हुंडेकरी यांनी जबाबदारी पार पाडली. या कार्यक्रमाचे पहिले बक्षीस रोख रुपये 1500 व सर्टिफिकेट बीबीए विभागाच्या विद्यार्थ्यांनी मिळवले तर दुसरे बक्षीस रुपये 1000 रोख व सर्टिफिकेट बी.कॉम. भाग दोन च्या विद्यार्थ्यांनी मिळविले. उत्तेजनार्थ दोन बक्षीस विद्यार्थ्यांना देण्यात आले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. डॉ. वंदना पुरोहित यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमासाठी कॉमर्स असोसिएशनचे समन्वयक प्रा. डॉ. आर. एम. खिलारे,मार्केटिंग फोरमचे प्रा. बसवराज हगरगुंडगी, प्रा. चेतन धुळखेडकर, प्रा. लता विटकर, प्रा. डॉ. सविता पाटील, प्रा. डॉ. महादेव खराडे, प्रा. डॉ. आसमा बागवान, प्रा. डॉ. वैशाली यांचे सहकार्य लाभले.

# शासकीय कामकाजात भाषेतील अचूकतेला महत्त्व आहे

### - निवृत्त सहा.पोलीस आयुक्त दीपकआर्वे

## संगमेश्वर कॉलेज ( स्वायत्त ) कनिष्ठ विभागात मार्गदर्शन




**सोलापूर ( दिनांक १९ ऑगस्ट )** ''आपल्या महाविद्यालयीन जीवनातील विविध भाषांचा अभ्यास करताना लेखन कौशल्य आपण आत्मसात केली पाहिजेत. जाणीवपूर्वक भाषेचे व्याकरण आपण शिकलो तर नक्कीच क्षेत्र कोणतेही असो प्रशासकीय पातळीवर आपण उत्तम आणि लोकाभिमुख काम करू शकतो.'' असे मार्गदर्शन निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त दीपकआर्वे यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेजच्या वतीने आयोजित केलेल्या शासकीय कामकाजातील भाषेचे महत्त्व या विषयावर या व्याख्यानात बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई उपस्थित होते.

संस्कृतचे प्रदीपआर्य यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर स्नेहा शहा हिने हिंदी भाषेचे महत्त्व सांगत आपले मनोगत व्यक्त केले. कॉलेजच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी दिलखुलास मार्गदर्शन केले. शासकीय कामकाजातील टिपण्यांना किती महत्त्व आहे आणि अचूकता आणि नेमकेपणा याचा वापर व्यवस्थित झाला तर प्रशासनात नेमकेपणा कसा येतो ? हे पोलीस प्रशासनातील अनेकविध अनुभव सांगत त्यांनी सांगितले.

आपले अध्यक्षीय मनोगतात उपप्राचार्य यांनी कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील वेगवेगळ्या भाषेचे अध्यापन करताना मुलांना भाषिक कौशल्याकडे वळवणे हे महत्त्वाचे असल्याने असे उपक्रम आम्ही महाविद्यालयीन स्तरावर राबवत असतो त्यामुळे वेगवेगळ्या भाषांची त्यातील लेखन कौशल्यांची ओळख होते असे सांगितले. अवनी आहुजा हिने सूत्रसंचालन केले तर श्रेयसी कुंटे हिने जर्मन भाषेत सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमाची संपूर्ण व्हिडिओ लिंक https://youtu.be/EZeG1vkhZTM?feature=shared कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा

संगमेश्वर कॉलेज सोलापूर

YouTube

# ‘स्पर्धा परीक्षेची तयारी’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

## यशस्वी जीवनासाठी पंचसूत्रांचा अवलंब करावा – मा. दिलीप स्वामी





**सोलापूर प्रतिनिधी**

विद्यार्थी जीवनात यश प्राप्त करणे ही प्रत्येकाची इच्छा असते. त्यासाठी कठोर परिश्रम करावेत असे सांगितले जाते. जिद्द, चिकाटी, परिश्रम या बरोबर मनात इच्छा असणे खूप गरजेचे आहे. मानसिक तयारी परीपूर्ण केल्यास यशाचा मार्ग सुकर होतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने सर्व प्रथम मनाची तयारी करावी म्हणूनच दृढनिश्चय हाच यशाचा मार्ग आहे असे विचार सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी मा. दिलीप स्वामी यांनी मांडले. संगमेश्वर कॉलेज मध्ये करिअर कट्टा आणि बी. ए. नागरी सेवा यांच्या वतीने ‘स्पर्धा परीक्षेची तयारी’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. या प्रसंगी मा. स्वामी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला शाखेचे उपप्राचार्य प्रा. सुहास पुजारी होते. मा. स्वामी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या यशस्वी जीवनाचे अनुभव सांगितले. संघर्षाशिवाय जीवनात यश मिळत नसते. प्रत्येक विद्यार्थ्यांनी कॉलेज जीवनात अधिक जागृत रहावे. एक अधिकारी होण्याचे स्वप्न पहावे, स्पर्धा परीक्षेत यशस्वी व्हायचे असेल तर पाच सूत्रे अंगीकृत करावीत. त्यामध्ये आई-वडील व गुरु यांच्या आज्ञाचे पालन, ध्येय निश्चिती, कठोर परिश्रम, वेळेचे व अभ्यासाचे नियोजन आणि आत्मविश्वास या गोष्टी महत्वाच्या आहेत असे मुलभूत विचार त्यांनी मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. शिवाजी मस्के यांनी करिअर कट्ट्याची माहिती देऊन केले. कायर्क्रमाचे सूत्रसंचालन कु. शोभा गाडेकर, पाहुण्यांचा परिचय कु. हर्षा श्रीगन तर आभार कु. ऋतुजा गवळी यांनी मानले.



# तरुणांनो तुम्हीच उद्याच्या राष्ट्र उभारणीचे शिलेदार आहात - ब्रिगेडियर अर्जुन मित्रा

## संगमेश्वरच्या ९ महाराष्ट्र NCC बटालियनच्या विद्यार्थ्यांची संवाद



**सोलापूर ( दिनांक १२ )** '' सप्टेंबर तरुणांनो तुम्हीच उद्याच्या राष्ट्र उभारणीचे शिलेदार आहात. एनसीसीच्या माध्यमातून राष्ट्र सेवेचे महान कार्य तुमच्या हातून होत आहे. हे कदापिही विसरू नका. एनसीसी मुलांना एसएसबी अर्थात सर्विस सिलेक्शन बोर्डाच्या ,आर्म्ड फोर्सच्या परीक्षेपर्यंत घेऊन जाते. सोबतच सी आर पी एफ आणि एस आर पी एफ यासारख्या आर्मी सर्विसेसमध्ये तुम्हाला उत्तम करिअर आहे. महत्त्वाचे म्हणजे राष्ट्राविषयी आणि आपल्या सोबत, आपले कुटुंब समाज आणि सामाजिक आरोग्य अबाधित राखण्यासाठी एनसीसी तुम्हाला घडवते. म्हणून तुम्ही उद्याच्या राष्ट्र उभारणीसाठी सज्ज झाले पाहिजे .'' असा दिलखुला संवाद ग्रुप कमांडिंग ब्रिगेडियर अर्जुन मित्र यांनी साधला. ते 9 महाराष्ट्र बटालियनच्या स्नेहसंमेलन प्रसंगी बोलत होते यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई, एनसीसी ऑफिसर, प्राचार्य प्रियांका समुद्रे आदी उपस्थित होते.

प्रारंभी ब्रिगेडियर अर्जुन मित्रा यांना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर एनसीसी स्नेहसंमेलनासाठी जमलेल्या सर्व कॅडेट्सना त्यांनी संबोधित केले. मेजर चंद्रकांत हीरतोट यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केलं.



या कार्यक्रमाची संपूर्ण व्हिडिओ लिंक
https://youtu.be/R7pxeGh0yq4
कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा

# चित्रकला कार्यशाळा उत्साहात

## कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचा उपक्रम



**सोलापूर : अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयात कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी रामचंद्र खरटमल, प्राचार्य सचिन गायकवाड, विठ्ठल मोरे, धर्मराज रामपुरे, वर्षा बाकळे व अन्य.**

**सोलापूर (शहर संचार प्रतिनिधी - दि. १२ )** सात रस्ता येथील कर्मयोगी अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयात हौशी कलावंत, कलाशिक्षक, विद्यार्थ्यांना नव्या रंगाची ओळख व्हावी, यासाठी चित्रकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या चित्रकार कार्यशाळेत सुप्रसिध्द रामचंद्र खरटमल यांनी विद्यार्थ्यांना सविस्तरपणे मार्गदर्शन केले. रंगांचा प्रकार, रंगांचे लोडिंग, रंगांची निवड करताना कोणती काळजी घ्यावी, रंगांचा टवटवीतपणा टिकण्यासाठी कोणती पध्दत वापरावी, रंगाच्या छटा बनविण्यासाठी कसा अभ्यास करावा, त्या अभ्यासातून कौशल्य कसे निर्माण करावे, याची माहिती खरटमल यांनी दिली.

सोलापूर : अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयात कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी रामचंद्र खरटमल, प्राचार्य सचिन गायकवाड, विठ्ठल मोरे, धर्मराज रामपुरे, वर्षा बाकळे व अन्य.

एक चित्रकार म्हणून काम करत असताना त्या-त्यावेळी केलेल्या कामावर येणारा रंगांचा अनुभव खूप महत्त्वाचा ठरतो. रंग हाताळताना त्याची माहिती, त्याचा गुणधर्म कळणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी प्राचार्य सचिन गायकवाड यांनी या उपक्रमाची माहिती दिली.

कोकियो कॅम्लिन कंपनीचे नंदकुमार गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. खरटमल यांनी एचडी रंगांद्वारे प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी दिलीप घेवारे, विठ्ठल मोरे, शेरशहा डोंगरी, धर्मराज रामपुरे, प्रवीण रणदिवे, यांनी आभार मानले. डॉ. सुहास सरवदे, धनराज काळे, वर्षा बाकळे, विपुल मिरजकर, विनायक घाटगे, अश्विनी लोंढे, मुकुंद सुरपूर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन मीनाक्षी रामपुरे यांनी केले. प्रा. मल्लिकार्जुन सालीमठ यांनी आभार मानले.

# जागतिक पोषण सप्ताहाच्या अनुषंगाने फ्रुट अँड व्हेजीटेबल कार्विंग स्पर्धा संपन्न
## संगमेश्वर महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र प्रयोगशाळेचे अनावरण

**सोलापूर ( दिनांक ८ )** रोजी संगमेश्वर महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्रविभागमध्ये जागतिक पोषण सप्ताह निमित्त फ्रुट अँड व्हेजीटेबल कार्विंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते . संगमेश्वर महाविद्यालयाच्या आवारात नवीन तयार करण्यात आलेल्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रयोगशाळेचेही अनावरण हि या निमित्ताने करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी स्थानी संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. देसाई व संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. गोठे हे उपस्थित होते.

प्रयोग शाळेचे अनावरण त्याच्या हस्ते करण्यात आले ,आजच्या फास्ट फूड च्या युगामध्ये दैनंदिन जीवनामधून कच्च्या भाज्यांचा व फळांचा वापर आहारातून कमी होत आहे . हि गोष्ट लक्षात घेऊन फळांना आणि भाज्यांना जर काही युक्त्या करून आकर्षक आणि चवदार बनवता येते व त्याचा वापर आहारामध्ये सहज करता येतो. भारतीय आहारशास्त्रानुसार आपल्या आहारातील किमान १/६ भाग आपण कच्या भाज्या व फळांचे सेवन केले पाहिजे त्यातील असणारी पोषक तत्वे आपणास बऱ्याच आजारांपासून लांब ठेवतात आणि एक निरोगी आयुष्य जगण्यास मदत करतात हीच कल्पना केंद्रवर्ती ठेवून संगमेश्वर महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बी .एस्सी . भाग १ ,२, व ३ मधील एकूण ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला तसेच कार्यक्रमासाठी ९५ इतर विद्यार्थ्यासहित अन्य शिक्षकांनी भेट दिली.














कार्यक्रम चे सूत्र संचालन विभागातील विद्यार्थी आफताब जमादार यांनी केले. या कार्यक्रमास व स्पर्धेस परीक्षक म्हणून इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या प्राध्यापिका डॉ. जोगदे संगीता यांनी केले . या कार्यक्रमास प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एम . बी . बगले , प्रा. एस .डी .शेख , प्रा.डॉ.वैभव बचूवार हे उपस्थित होते . स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. एम .दहिटणेकर तसेच प्रा. डॉ .एस. व्ही खडतरे प्रा .डॉ . सौरभ जाधव , प्रा. संगीता शिंपी या प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विभागाचे शिक्षकेतर कर्मचारी श्री रेवणसिद्ध कोळी , श्री विनायक सारंगमठ , श्री मेघराज मंद्रुपकर यांचेही सहकार्य लाभले .




या कार्यक्रमाची संपूर्ण व्हिडिओ लिंक
https://youtu.be/JPHFy2M-xvY?feature=shared
कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा

संगमेश्वर कॉलेज सोलापूर

YouTube




# कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी जयंती प्रीत्यर्थ राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत केतन लिगाडे प्रथम



दैनिक संचार प्रबोधन मंच,संगमेश्वर कॉलेज ( स्वायत्त )आणि कर्मयोगी अप्पासाहेब नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कर्मयोगी अप्पासाहेब काडादी जयंती प्रीत्यर्थ महाविद्यालयीन उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा काल संपन्न झाली. राज्यभरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. उस्फुर्त वक्तृत्व स्पर्धेतअध्यात्म,धर्म,अर्थव्यवस्था,कला,साहित्य,संगीत यासह समाजातील सर्वच स्तरावरील आपले विषय वैविध्यपूर्ण पद्धतीने मांडले.

निकाल

प्रथम – केतन लिगाडे ( बी एम आय टी ,सोलापूर ), द्वितीय क्रमांक – संकेत पाटील ( शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज ) तृतीय क्रमांक – पर्जन्य अंजुटगी (दयानंद कॉलेज, सोलापूर ) चतुर्थ क्रमांक– सौरभ वाघमारे (सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे ) पाचवा क्रमांक– श्रेया माशाळ( संगमेश्वर कॉलेज, सोलापूर) सहावा क्रमांक विभागून – प्रज्ञा श्रीकांत माळकर ( गरवारे कन्या कॉलेज, सांगली ) सहावा क्रमांक विभागून –अनुष्का बिराजदार ( वालचंद कॉलेज, सोलापूर ) ऐश्वर्या सुरडे ( एलबीपी कॉलेज, सोलापूर ) उत्तेजनार्थ – प्राजक्ता सुरवसे ( वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर )

पारितोषिके

प्रथम क्रमांक – २५०१ रुपये
द्वितीय क्रमांक – १५०१रुपये
तृतीय क्रमांक – १००१ रुपये
चौथा क्रमांक – ७५१ रुपये
पाचवा क्रमांक – ५५१ रुपये
सहावा क्रमांक – ५०१ रुपये
उत्तेजनार्थ दोन प्रशस्तिपत्रके



प्रारंभी संगमेश्वर कॉलेजच्या आवारात झालेल्या उदघाटन सत्रात सकाळी कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांना अभिवादन करून यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. दैनिक संचार च्या उपसंपादक प्रशांत जोशी यांनी या सत्राचे प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांच्या सत्कारानंतर उपस्थित परीक्षक परीक्षक फैय्याज शेख,प्रा.डॉ. शुभदा उपासे, प्रा.एस. एस. उकळे यांचा कॉलेजच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उदघाटक प्रा. केदार काळवणे ( संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ) ,प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई , कर्मयोगी अप्पासाहेब नागरी सहकारी पतसंस्थेचे प्रा. बी. एन. पटणे,दैनिक संचारचे उपसंपादक प्रशांत जोशी ,स्पर्धा समन्वयक प्रा. शिवराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी आपल्या अभ्यासपूर्ण शैलीत डॉ. काळवणे यांनी कर्मयोगी अप्पासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख उपस्थितांसमोर ठेवला आणि वक्तृत्व स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना मार्गदर्शन केले.

स्पर्धा यशस्वितेसाठी प्रा. राजकुमार खिलारे, प्रा. शीला रामपुरे डॉ. मंजू संगेपाग, प्रा.एस बी निंबर्गी,प्रा. संतोष मेटकरी,प्रा. सुहास दहिटणेकर, प्रा. शिवशरण दुलंगे ,रविशंकर कुंभार आदींनी सहकार्य केलं तर तंत्र सहाय्यक म्हणून संतोष फुलारी यांनी सहाय्य केले.डॉ.सुहास पुजारी यांनी शेवटी निकाल घोषित केला. या वक्तृत्व स्पर्धेचे सूत्रसंचालन दत्तात्रय गुड्डेवाडी आणि प्रा.तेजश्री तळे यांनी केले. तर आभार प्रा.संगीता म्हमाणे यांनी मानले.

या कार्यक्रमाचे संपूर्ण व्हिडिओ या लिंक वर उपल आहे
https://youtu.be/jNLNyIFCINM?feature=shared
कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा

YouTube

# कर्मयोगी अप्पासाहेब जयंती.... आकाशवाणी आणि संगमेश्वर पब्लिक स्कूल आयोजित वक्तृत्व, रंगभरण व पत्रलेखन स्पर्धा संपन्न

## मुलांना आवडीच्या क्षेत्रात संधी उपलब्ध करून द्या - अभियंता अर्चिता ढेरे



**सोलापूर ( शहर संचार दिनांक १६ )** '' पालकांनो सध्याचे युग हे स्पर्धेचे आणि तंत्रज्ञानाचे आहे प्रत्येक क्षेत्रात तीव्र स्पर्धा आहे. या स्पर्धेत सामील होताना मुले मशीन न होता माणूस कसे बनतील याकडे काळजीपूर्वक लक्ष द्या. गुणवत्तेसाठी स्पर्धा जरूर करावी. मात्र त्याचा अतिरेक न करता मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात संधी उपल करून द्या .ती नक्कीच यशस्वी बनतील.'' असे प्रतिपादन आकाशवाणी सोलापूर केंद्राच्या अभियांत्रिकी विभागप्रमुख अर्चिता ढेरे यांनी केले. त्या आकाशवाणी आणि संगमेश्वर पब्लिक स्कूल आयोजित आंतरशालेय रंगभरण, वक्तृत्व आणि पत्रलेखन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षी या स्पर्धा संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये होतात. याप्रसंगी व्यासपीठावर श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापन समिती सदस्या शितल काडादी, प्राचार्या प्रियंका समुद्रे , परीक्षक संजीव समन, इमरान सय्यद ,शिवराज देसाई,श्यामसुंदर माने, अश्विनी बिराजदार ,मानसी झळकेकर आदी उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते कर्मयोगी आप्पांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून दीपप्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले. प्राचार्य प्रियंका समुद्र यांनी प्रास्ताविक केलं. पाहुण्यांची ओळख वंदना श्रीमल यांनी करून दिली. संस्थेच्या वतीने प्रमुख पाहुण्यांच्या तसेच परीक्षकांचा सत्कार झाला. आकाशवाणीच्या माध्यमातून मातृभाषेच्या वैविध्यपूर्ण माहिती मनोरंजनाच्या बाबी शिकायला मिळतात. असे सांगत ढेरे यांनी विद्यार्थी स्पर्धक, पालकांशी अदिलखुलास संवाद साधला.

**निकाल यांप्रमाणे** -------------

रंगभरण स्पर्धा (गट - एलकेजी युकेजी) प्रथम क्रमांक - युवनाते उन्नती उमेश (दमाणी विद्यामंदिर ) द्वितीय क्रमांक - जगताप श्रावणी विवेक (राज मेमोरियल इंग्लिश स्कूल) तृतीय क्रमांक - बालिंगल जान्हवी राघवेंद्र (प्रिसिजन स्कूल )

गट पहिली दुसरी- प्रथम क्रमांक - जमखंडी कलाश्री मल्लिनाथ ( दमाणी विद्यामंदिर ) द्वितीय क्रमांक - कमटम श्रीवंदना गिरीश ( महेश इंग्लिश स्कूल ) तृतीय क्रमांक - एलदी वेदांत संजय ( वेलेंटाईन सर्कल इंग्लिश मीडियम स्कूल )

इयत्ता तिसरी चौथी ( चित्रकला आणि रंगभरण ) प्रथम क्रमांक- पोपळकर पियुष सतीश ( दमाणी विद्यामंदिर ) द्वितीय क्रमांक - गावडे नागेश रमेश (गांधीनाथा रंगजी हायस्कूल) तृतीय क्रमांक - खान अनस इम्तियाज ( रॉजर्स इंग्लिश मीडियम स्कूल )

पत्रलेखन स्पर्धा इंग्रजी मराठी - गट इयत्ता पाचवी सहावी - प्रथम क्रमांक - कामलीवाले उम्मेहनी (संगमेश्वर पब्लिक स्कूल) द्वितीय क्रमांक - जमादार सफा (संगमेश्वर पब्लिक स्कूल ) तृतीय क्रमांक - चौगुले अक्षरा ( दमाणी विद्यामंदिर )

इयत्ता सातवी आठवी - प्रथम क्रमांक - सुरवसे दिग्विजय शक्तीसागर ( दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला ) द्वितीय क्रमांक - पाटील भार्गव योगिनाथ( दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला ) तृतीय क्रमांक - हुल्ले प्राची अशोक ( सिद्धेश्वर गर्ल्स हायस्कूल )

गट इयत्ता नववी दहावी - प्रथम क्रमांक - बिराजदार साक्षी ( सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल ) द्वितीय क्रमांक - घोडके कार्तिकी गजेंद्र ( सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल ) तृतीय क्रमांक - समृद्धी बताले ( दमाणी प्रशाला )

वक्तृत्व स्पर्धा गट इयत्ता पाचवी सहावी- प्रथम क्रमांक - आलदर समृद्धी अविनाश ( एस.आर. चंडक इंग्लिश मीडियम स्कूल ) द्वितीय क्रमांक - पाटील केदार महेश ( शरदचंद्र पवार प्रशाला, सोलापूर) तृतीय क्रमांक - रेवा गांधी ( संगमेश्वर पब्लिक स्कूल )

गट इयत्ता सातवी आठवी - प्रथम क्रमांक - मोरे अस्मिता सुरेश ( शरदचंद्र पवार प्रशाला ) द्वितीय क्रमांक - झेंडेकर समिधा नारायण ( सिद्धेश्वर मॉन्टेसरी स्कूल ) तृतीय क्रमांक - राठोड कृष्णा कांतु ( ज्ञानप्रबोधिनी बालविकास मंदिर )

गट इयत्ता नववी दहावी - प्रथम क्रमांक - चव्हाण नक्षत्र मुकेश ( एस.आर.इंग्लिश मीडियम स्कूल ) द्वितीय क्रमांक - पवनी नितीन हिबारे ( एस.आर.इंग्लिश मीडियम स्कूल ) तृतीय क्रमांक - यळमेली वैष्णवी हनुमंत ( सिद्धेश्वर गर्ल्स हायस्कूल )

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी वीणा अन्नलदास, मेहजबीन सय्यद, हरीश पुठ्ठा, सुरज दिडोरे, शोभा गोटे , सांस्कृतिक विभागातील शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले.सूत्रसंचालन प्रीती दुलंगे यांनी केले तर आभार उमाअश्विनी नारा यांनी मानले.

या कार्यक्रमाची संपूर्ण व्हिडिओ लिंक
https://youtu.be/FyxtevUn3kk?feature=shared
कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा

# कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या 114 व्या जयंती निमित्त अभिनव उपक्रम सप्ताह

## पुष्प 4 थे - संगमेश्वर महाविद्यालयास शैक्षणिक सदिच्छा भेट




कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या 114 व्या जयंतीनिमित्त सुरू असलेल्या अभिनव उपक्रम सप्ताह अंतर्गत आज बुधवार दि. 13.09.2023 रोजी श्री सिद्धेश्वर देवस्थान संचलित सिद्धेश्वर प्रशालेतील इ. 10 वीच्या अ, ब, क या तुकडीतील विद्यार्थ्यांनी कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांनी उभ्या केलेल्या अनेक शैक्षणिक संस्थांपैकी नावाजलेली व प्रसिद्ध संस्था म्हणजे संगमेश्वर महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी कॉलेजचे प्राचार्य मा. डॉ.राजेंद्र देसाई व उपप्राचार्य मा. श्री प्रसाद कुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक डॉ.गणेश मुडेगावकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करीत महाविद्यालयीन जीवनाची जबाबदारी समजावून दिली. तदनंतर विद्यार्थ्यांनी विविध विभागांना भेटी दिल्या.

यामध्ये संगणक विभागाच्या सौ.स्नेहल खैरे यांनी अत्याधुनिक संगणक कक्ष दाखवून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घातली.*भौतिकशास्त्र विभागाचे श्री.चंद्रकांत हिरतोट*, प्रा. अभिजित निवर्गिकर, प्रा. प्रियांका पाटील यांनी विद्यार्थ्यांना विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणाची माहिती दिली. रसायनशास्त्र विभागाचे श्री.बी.एम.कापसे, प्रा. आहेरकर, प्रा. पाटील, प्रा. विशाल जत्ती यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे विविध रसायनांची माहिती दिली. जीवशास्त्र विभागाचे श्री.रामराव राठोड यांनी विद्यार्थ्यांना विविध जीवाश्म अवशेषांची ओळख करून दिली. यानंतर महाविद्यालयाचा भव्य-दिव्य ग्रंथालय जिथे एक लाखाहून ही अधिक पुस्तके उपल आहेत अशा विभागाची माहिती डॉ.मुलीमनी आणि श्री. संतोष कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना करून दिली.

त्याचबरोबर प्रशालेच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत प्रशालेस कॉलेजचा प्रसिद्ध 'प्रज्ञा' हा वार्षिकांक भेट दिला. याचबरोबर जेईई, नीट, सिईटी सेल समन्वयक डॉ.गणेश मुडेगावकर, इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या सौ.शुभदा कुलकर्णी आणि क्रीडा विभागाचे श्री संतोष केंडे यांनी विद्यार्थ्यांना आपापल्या विभागाची माहिती दिली.

उल्लेखनीय बाब म्हणजे भारताच्या प्रसिद्ध NIT कॉलेजमधील रँक होल्डर डॉ. अजित राय यांनी मुलांना विविध स्पर्धा परीक्षांची माहिती सांगत पुढील शैक्षणिक वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.

▪ अशाप्रकारे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.संतोष पाटील,उपमुख्याध्यापक श्री.राजकुमार उंबरजे व पर्यवेक्षक श्री.विनोद बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या सदिच्छा भेटीस इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक श्री.शिवानंद हिरेमठ, श्री.रविंद्र कबाडे व श्री.योगिनाथ वाघोले त्याचबरोबर श्री.निलेश दंतकाळे तसेच इ.10वीचे विद्यार्थी आदी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडल्याने महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वीच महाविद्यालयाची माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

# संगमेश्वर पब्लिक स्कूलची गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात



**" गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या "** या निनादात संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या गणपती बाप्पांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. यामध्ये शाळेतले विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. सात दिवसांच्या विविध उपक्रमातून वैविध्यपूर्ण स्पर्धा घेण्यात आल्या. या गणेशोत्सवाचे सांगता बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीने झाली.भारतीय संस्कृती व परंपरा यांची जपवणूक करणे व हस्तां

तर करणे याचा ध्यास मनी ठेवून संगमेश्वर पब्लिक स्कूल नेहमी शाळेमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवत असते. सालाबाद प्रमाणे शाळेमध्ये गणपतीची प्रतिष्ठापना उत्साहात करण्यात आली होती. पारंपारिक वेशभूषेत विद्यार्थिनींच्या लेझीम पथकाने या मिरवणुकीमध्ये उत्साही रंग भरले. या सादरीकरणासाठी शाळेचे नृत्य शिक्षक हरीश पुठ्ठा यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. ढोल ताशांच्या निनादात संगमेश्वर पब्लिक स्कूल ची मिरवणूक सात रस्ता, कामत चौक ,एम्प्लॉयमेंट चौक, हुतात्मा चौक, मार्गे सिद्धेश्वर तलाव इथे पोहचली.विधिवत गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले.

याप्रसंगी शाळेचे संस्थापक धर्मराज काडादी , शितल काडादी, तेजश्री काडादी तसेच स्कुलच्या प्राचार्या प्रियांका समुद्रे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.
सोलापूर (दिनांक २५ )

# हिंदी भाषेच्या माध्यमातून वाढत्या रोजगाराच्या संधी - डॉ. दरेप्पा बताले

## हिंदी दिवसानिमित्त डिजिटल पत्रिकेचे उद्‌घाटन






**सोलापूर ( दैनिक संचार प्रतिनिधी )** '' हिंदी भाषा आज जगामध्ये तिसऱ्या क्रमांकाची भाषा आहे. दिवसेंदिवस जागतिक स्तरावर हिंदीचे महत्त्व वाढत आहे. ज्याप्रमाणे रोजगाराचे क्षेत्र विस्तारात आहे. त्याप्रमाणे ज्ञान, विज्ञानाबरोबर रोजगाराची भाषा म्हणून हिंदीचे महत्त्व अधोरेखित करता येईल. आज विज्ञान - तंत्रज्ञान, सरकारी कार्यालय, पत्रकारिता, फिल्म, उद्योग, जाहिरात, लेखन क्षेत्र,पर्यटन, टीव्ही पर्यंत वेगवेगळ्या माध्यमातून हिंदी भाषा वापरली जाते. सिनेमापासून साहित्यपर्यंत, मोबाईल, व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, वेब पोर्टल, अशा अत्याधुनिक दळणवळण विभागात हिंदी प्रभावी ठरते आहे. या विभागांमध्ये देखील वैविध्यपूर्ण रोजगाराच्या संधी आहेत. हिंदी ही रोजगाराची भाषा बनली आहे. दूरदर्शनवरील हिंदीचे स्थान दिवसेंदिवस ठळक होत आहे. त्यामुळे महाविद्यालयांचे त्यामुळे महाविद्यालयीन जीवनामध्ये युवकांनी हिंदी भाषा शिकण्यासाठी मनोभावे प्रयत्न केले पाहिजे. भारतीय स्वातंत्र्यापासून ते वर्तमानात राष्ट्रीय ऐक्याची मोट बांधणारी हिंदी भाषा एकविसाव्या शतकात नवनिर्माणाची भाषा ठरेल यात शंका नाही,'' असे मत डॉक्टर दरेप्पा बताले यांनी व्यक्त केले. ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या हिंदी राष्ट्रभाषा दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते. मंचावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, संयोजक प्रा. शिवराज पाटील उपस्थित होते. प्रारंभी त्रिशा म्हेत्रे हिने प्रास्ताविक केले.वैष्णवीभरमगोंडे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रिया पाटील हिने सूत्रसंचालन केलेतर संजीवनी बनसोडे हिने आभार मानले. याप्रसंगी हिंदी विभागप्रमुख संघप्रकाश दुडडे, प्रा.संतोष पवार, विद्यार्थीगण उपस्थित होते.

या कार्यक्रमाची संपूर्ण व्हिडिओ लिंक
https://youtu.be/585ui_7JKGg
कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा

संगमेश्वर कॉलेज सोलापूर

## संगमेश्वर कॉलेजमध्ये हिंदी दिनानिमित्त डॉ.नसीमा पठाण यांचे मार्गदर्शन यांचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाची संपूर्ण व्हिडिओ लिंक
https://youtu.be/1bDhawFmW5M

संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# संगमेश्वर कॉलेजमध्ये (AICRA ) पहिल्या रोबोटीक सेंटरची सुरुवात



सोलापूर ( शहर संचार प्रतिनिधी ) ऑल इंडिया कौन्सिल फॉर रोबोटिक्स अँड ऑटोमेशन दिल्ली यांच्या मार्फत संगमेश्वर कॉलेजमध्ये (AICRA ) पहिल्या रोबोटीक सेंटरची सुरुवात झालीय. श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कर्मयोगी कै.अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतिनिमित्त संस्थेचे सचिव धर्मराज काडादी साहेब यांच्या हस्ते स्किल सेंटरचे उदघाटन इलेक्ट्रॉनिक्स विभागात झाले. याप्रसंगी श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई, Suvi Instrument कंपनीचे सोलापूर जिल्ह्याचे प्रमुख डॉ.एस.एम. तोडकरी,शैक्षणिक सल्लागार विभागाचे प्रा. डॉ. प्रमोद दर्गोपाटील,भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शुभांगी साळुंके,उपप्राचार्य प्रसाद कुंटेआदी मान्यवर उपस्थित होते.

AICRA ही एक केंद्रशासनाची रोबोटीक संदर्भात सर्व भारतातील शाळा, महाविदयालयामध्ये स्कील कोर्सेस राबवणारी संस्था आहे. तसेच या AICRA संस्थेमार्फत Suvi - Instrument होडगी रोड यांना रोबोटीक ॲन्ड ॲटोमेशन प्रशिक्षण देण्याकरीता सोलापूर जिल्हयासाठी प्रतिनिधी म्हणून नेमले आहे. या प्रसंगी बोलताना Suvi Instrument कंपनीचे प्रमुख डॉ.एस.एम. तोडकरी यांनी रोबोटीक,आर्टिफिशल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्स क्षेत्रातील महत्व पटवून दिले. सध्या 5G इंटरनेट मुळे प्रचंड माहिती समोर येते, त्यातून उपयुक्त माहितीचा वापर नाव निर्मितीसाठी होतो. आपण जेंव्हा ई-कॉर्मस साईट वर माहितीचा शोध घेतो तेंव्हा त्या वस्तूंची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांच्या जाहिराती आपल्या कम्युनिकेशन साधनांमध्ये येतात आणि त्या कंपन्यांचे प्रमोशन फोन देखील आपल्यापर्यंत पोहोचत असतात.तर हा एक डेटा सायन्स व आर्टिफिशल इंटेलिजन्सचा भाग आहे.'' असेही त्यांनी सांगितले.





याप्रसंगी बोलताना धर्मराज काडादी म्हणाले की, '' बंगलोर सारख्या मोठया शहरात घरातील कामे करण्याकरीता रोबोट सारख्या मशिनचा वापर करण्यात येतो. ड्रोणच्या साहयाने शेती सुध्दा करण्यात येते. अश्या नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन नवीन ( इन्स्ट्रुमेंट्स) साधने बनवावीत. प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात रोबोटिक्स तंत्रज्ञान नक्कीच मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी वापरात येणार आहे. अभियांत्रिकेतील ऑटोमेशन देखील यात यापूर्वीच आलेले आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करुन नवतंत्रज्ञानाची कास धरण्याची विद्यार्थ्यांना गरज आहे.''

याप्रसंगी कॉलेजचे इलेक्ट्रॉनिक्सचे विभागप्रमुख प्राचार्य डॉ.आर.व्ही.देसाई म्हणाले की विदयार्थ्यांनी या स्कील सेंटरचा उपयोग करुन माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात नोकरी मिळवावी. कॉलेजने उपल करुन दिलेल्या संधीचा लाभ घ्यावा. यापसंगी सौ.एस.पी.कुलकर्णी, Suvi Instrument चे डॉ.पी.एम.गव्हाणे,डॉ.वैभव बच्चूवार,अमित जगधने तसेच महाविदयालयातील प्राध्यापक, शिक्षक,संशोधक विदयार्थीवर्ग मोठया संख्येने उपस्थित होता. सूत्रसंचालन प्रा.डॉ.पुष्पांजली म्हेत्री यांनी केले, पाहुण्यांचे स्वागत प्रा.डॉ.संगिता जोगदे यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी मानले.

# संगमेश्वरमध्ये जागतिक पर्यटन दिन साजरा






पर्यटन क्षेत्राला बळकटी मिळावी या उद्देशाने २७ सप्टेबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. जगभर पर्यटन विकास अत्यंत वेगाने होत असून लोकांना मिळणाऱ्या सुट्यांच्या काळात वाढ झाली असून आर्थिक आवकही वाढत आहे. शिक्षण, निवास व्यवस्था व वाहतूक सुलभ झाल्याने पर्यटन विकासाला अमर्याद संधी आहे असे विचार इको फ्रेंडली क्लबचे संस्थापक परशुराम कोकणे यांनी मांडले. संगमेश्वर कॉलेजमध्ये भूगोल विभागाच्या वतीने जागतिक पर्यटन दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कोकणे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भूगोल विभागप्रमुख डॉ. राजकुमार मोहरकर होते.

पुढे कोकणे म्हणाले की,'' प्रत्येकाने किमान १० गडकिल्ले सर करावे. पर्यटन करत असताना ते पर्यावरण पूरक असावे. पर्यटनात स्थानिक लोकांना व त्यांच्या सेवांना महत्व द्यावे. सोलापूर जिल्हा हा देखील अनेक पर्यटन स्थळांनी समृद्ध असून त्याचा प्रचार आणि प्रसार होणे गरजेचे आहे. पर्यटनाच्या माध्यमातून सोलापूरात उत्पादित होणारे चादर, टॉवेल, कडक भाकरी, शेंगा चटणी या उत्पादनाचा प्रचार व प्रसार करून रोजगाराच्या संधी उपल करता येतात.''

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बिरप्पा सोनकडे , प्रास्तविक पाहुण्यांचा परिचय करून देत डॉ. शिवाजी मस्के यांनी प्रास्ताविक केले तर आभार महेश नरुटे मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.मंजू संगेपाग,प्रा.शिरीष जाधव,डॉ.वैभव इंगळे,प्रा.धनश्री कारळे यांनी परिश्रम घेतले. यावेळी डॉ. प्रकाश कादे,डॉ.राहुल साळुंखे,अजित कोकणे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंटरनेटच्या आभासी युगात ऑनलाइन धोक्यांची जाणीव करून घ्या. - पोलीस निरीक्षक - एस.एस.गजा

## सायबर गुन्हे जागरूकतेविषयी पोलिसांनी साधला तरुणांशी संवाद





**सोलापूर शहर प्रतिनिधी** ''इंटरनेटच्या आभासी जगाला भौगोलिक, आर्थिक, सामाजिक असे कोणत्याही प्रकारचे बंधने नाहीत. हे आपण सारेच अनुभवतो आहोत. मात्र पालक, घरातील प्रौढ व्यक्ती यांनाच 'ऑनलाइन' धोक्यांची व्याप्ती आणि तीव्रता याची जाणीव नसल्याने लहान मुले, विद्यार्थी सहजपणे ऑनलाइन धोक्यांना बळी पडतात. सायबर सुरक्षा या विषयाबाबत काम करताना संपर्कात आलेल्या केसेस आणि अनुभवांवरून ऑनलाइनच्या आभासी जगातील सायबर धोके समोर आणून त्याची माहिती करून देण्याचे काम पोलिसांनी केले आहे.पालकांना, घरातील प्रौढ व्यक्तींना सर्वांत आधी ऑनलाइन धोक्यांची जाणीव करून द्या आणि त्यापासून बचाव कसा करायचा हे शिकवणे ही आता काळाची गरज बनली आहे.''

असे मत कॉलेजेचे माजी विद्यार्थी मा.एस.एस.गजा ( पोलीस निरीक्षक, सायबर गुन्हे शाखा ) यांनी मांडले. संगणक विज्ञान विभागाने सायबर गुन्हे जागरूकता विषयी अतिथी व्याख्यान आयोजित केले होते त्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर ए.ए.नळेगावकर (सहायक पोलीस निरीक्षक ), वसीम शेख, प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई, प्रा.ज्योती काडादी ( संचालक, संगणक विज्ञान विभाग) आदी उपस्थित होते.



वसीम शेख यांनी सायबर क्राइम म्हणजे काय? आणि आपण कसे जागरूक असले पाहिजे? याविषयी प्रबोधन केले. सहायक पोलीस निरीक्षक ए.ए.नळेगावकर यांनी सायबर गुन्ह्यांच्या वास्तविक जीवनातील घटनांबद्दल चर्चा करून विविध प्रकारच्या सायबर गुन्ह्यांची माहिती करून दिली.

'' तुम्ही इंटरनेट वापरावे, पण इंटरनेटने तुम्हाला वापरू नये यावर भर द्या. सध्याचा जमाना आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे.आभासी जगामध्ये फसवणूक खूप मोठ्या प्रमाणात होत आहे आणि विद्यार्थ्यांना विविध गुन्ह्यामध्ये अडकवले जात आहे यापासून आपण सावधानराहिले पाहिजे.'' असा आहे मोलाचा सल्ला सायबर क्राईम तज्ञ गजा याने दिला.

कार्यक्रम शस्वीतेसाठी यांनी प्रा.सौ.आर.व्ही.हुंडेकरी, प्रा.मा. बी.एस. बुक्का (कार्यक्रम समन्वयक ) परिश्रम घेतले. याप्रसंगी संगणक व व्यवस्थापन शास्त्र शाखेतील बहुसंख्य विद्यार्थी प्राध्यापक उपस्थित होते.

९ सप्टेंबर २०२३



# संगमेश्वरमध्ये विद्यार्थ्यांकडून 'कृतज्ञता सोहळा'

## शिक्षकदिन उत्साहात










सोलापूर ( दिनांक 5 सप्टेंबर ) भारताचे माजी राष्ट्रपती, थोर तत्वज्ञ, भारतरत्न, शिक्षक डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस संपूर्ण भारत वर्षात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. शिक्षक दिनाचे औचित्य साधून संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन विद्यार्थ्यांनी केले होते. या प्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रसाद कुंटे पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, ज्येष्ठ शिक्षक तानाजी घाडगे उपस्थित होते .

प्रारंभी स्वरदा मोहोळकर, वैष्णवी घाडगे यांनी स्वागत गीत सादर केले. विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या कृतज्ञता सोहळ्याचे प्रास्ताविक जान्हवी परदेशी हिने केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचा सत्कार झाला. सत्कारानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्यकर्तुत्वाचा आढावा घेत आपली मनोगते व्यक्त केली. यामध्ये श्रेयसी कुंटे,आरती ओव्हाळ, राजश्री गाडेकर, प्रतिमा टोणपे, सृष्टी खरात यांनी मराठीतून आपलं मनोगत व्यक्त केलं. तर ऋग्वेद देशमुख (संस्कृत) अवनी अहुजा (हिंदी) सुमित्रा म्हेत्रे (कन्नड) उत्तमा ढगे ( इंग्रजी ) यांनी त्यांच्या आवडीच्या भाषेतून उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षकांच्या मनोगतात तानाजी घाडगे, दत्तात्रय गुट्टेवाडी, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात उपप्राचार्य यांनी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या सोहळ्याचे कौतुक केले आणि सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.सूत्रसंचालन समीक्षा डोके आणि राधिका देशपांडे यांनी केले तर सृष्टी खरात हिने सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमाची संपूर्ण व्हिडिओ लिंक
https://youtu.be/585ui_7JKGg
कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा

2021 च्या राज्यसेवा परीक्षेत राज्यातून चौथ्या क्रमांकावर उत्तीर्ण झालेले सुधाकर लेंडवे यांचं स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना या विषयावर संगमेश्वर कॉलेजमध्ये मार्गदर्शन झाले.
https://youtu.be/Hs1zyQ9Qh90

इ.११वी मराठी युवकभारती अभ्यासांतर्गत रेडिओ जॉकीअमृत यांच्याशी साधलेला संवाद
https://youtu.be/h80KK1tOHOQ

## कॉलेजच्या यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या आणि सबस्क्राईब करा...















